# सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.नआ/वै/स्थासंक/८/४/२४
आयुक्त यांचे कार्यालय,
सोलापूर. दि.८.०४.२०११

## जाहिर प्रसिध्दीकरण

# * स्थानिक संस्था कर *

सोलापूर शहराच्या हद्दीमध्ये उपयोग,उपभोग किंवा विक्री यासाठी येणाऱ्या मालाच्या प्रवेशावर दिनांक १ एप्रिल २०११ पासून स्थानिक संस्था कर बसविण्यासंबधीची माहिती विविध वृत्तपत्रातून महानगरपालिकेने प्रसिध्द केलेली आहे.

मा.महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभाग,मंत्रालय यांचेकडील पत्र क्रं. LBT-2011/CR-22 /11 /UD-34 ( 2 ) Dated 18 Feb.2011 नुसार मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ (ब),१५२ (P) व १५२ (Q) नुसार, मा.शासनास असलेल्या अधिकारानुसार नोटीफिकेशन प्रसिध्द केलेले आहे.त्यानुसार दि.१.०४.२०११ पासून शेडयुल 'A' नुसार लागू करणेचे स्थानिक संस्था कराचे दर मंजूर केलेले आहेत. त्याचप्रमाणे शेडयुल 'B' नुसार काही मालावर सुट दिलेली आहे. त्यासबंधीचे मान्यता प्राप्त स्थानिक संस्था कराचे दर सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.com या संकेत स्थळावर उपलब्ध केलेले आहेत.त्यानुसार स्थानिक संस्था कराची आकारणी करणे चालू आहे.

स्थानिक संस्था कराचे मंजूर दर इंग्रजीमध्ये वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.त्या इंग्रजी शब्दांचा शक्यतो मराठी शब्द सोबतच्या तक्त्यानुसार आहे.प्रस्तुत मराठी शब्द हे व्यापाऱ्यांना सुलभ पध्दतीने समजण्यासाठी दिलेले आहेत.परंतू प्रस्तुत मराठी शब्द स्थानिक संस्था कराचा मजकूर प्रसिध्द केलेल्या इंग्रजी शेडयुलचे प्रमाणित किंवा कायदेशीर भांषातर नाही.

सबब, मुळ इंग्रजी मजकूर कायदेशीर व प्रमाणित आहेत.

(सौरभ राव ) - भा.प्र.से.
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.